# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १३३ वा ❑ मंगळवार दि.८ जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


# ''विठ्ठल आवडी प्रेम भावे'' कार्यक्रम अफाट रंगला

**छत्रपती संभाजीनगर** – कासार साथी प्रतिष्ठान आयोजित केशव निर्मित स्वरभक्ती प्रस्तुत ''विठ्ठल आवडी प्रेम भाव'' कार्यक्रम रविवारी, ६ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त टाळ्यांच्या कडकडाटात आणि अभंगांसह गवळण, भारूड आणि देवाच्या लग्नावर आधारित ''या पंढरपुरात काय वाजत-गाजत, सोन्याचं बाशिंग लगीन देवाचं लागतं'' अशा गीतांना रसिकांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. काहीजण ठेका धरून उत्स्फूर्तपणे नाचले, तर काही जणांनी पुन:पुन्हा ''वन्स मोर'' ची मागणी झाली. मराठवाडा साहित्य परिषदेच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




लाईव्ह सादरीकरण लावणीच्या कार्यक्रमात रसिक जसे ठेका धरून नाचतात, तशाच प्रकारे अवीट गोडीच्या चालींवरील अभंगावरही रसिकांनी मंचासमोर ठेका धरून बेभान नृत्य केले, हे या कार्यक्रमाचे वेगळेपण म्हणावे लागेल. आषाढी एकादशीनिमित्त छत्रपती संभाजी नगरांत विविध नाट्यग्रहांमध्ये विठ्ठल नामाचा गजर करणाऱ्या कार्यक्रमांची रेलचेल होती. बहुसंख्य कार्यक्रम विशिष्ट चौकटीतील अभंगांच्या पलीकडे फारसे काही देताना आढळत नाही. मात्र, ''विठ्ठल आवडी प्रेम भावे'' हा कार्यक्रम त्यास अपवाद ठरला.

कार्यक्रमाचे सूत्रधार इंजिनिअर केशव कुंभकर्ण यांच्या लाईव्ह निवेदनासह संपूर्ण कार्यक्रमच तसा ''लाईव्ह'' सादर झाला. अभंगांसह आशयपूर्ण रचना, अवीट गोडीच्या चाली, गायकांचा हृदयस्पर्शी स्वर आणि त्याच ताकदीची संगीतसाथ यामुळे कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. उपस्थित रसिकही विठ्ठल नामात दंग झाले होते. बहुतांश अभंग, गवळण आणि भारुडांना उपस्थित रसिकांनी डोक्यावर घेतले.

कार्यक्रमाची सुरुवात ''श्रीविठ्ठल नामाच्या गजरा'' ने झाली. श्रीविठ्ठलाच्या नामस्मरणाने संपूर्ण नाट्यगृह विठ्ठलमय झाले होते. यानंतर संत एकनाथ महाराजांच्या या पंढरीचे सुख अभंग सादर झाला. ''सूर नवा ध्यास नवा'' फेम गायिका संज्योती जगदाळे यांनी आपल्या दमदार आणि सुरेल गायनाने सभागृह डोक्यावर घेतले. युवा गायक दीपक राऊत यांनी नाम तुझे घेता देवा हे भक्तिगीत आपल्या विशिष्ट शैलीत सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाचे शीर्षक गीत ''विठ्ठल आवडी प्रेम भाव'' यासह अबीर गुलाल उधळीत रंग, नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग, जोहार मायबाप जोहार, तुमच्या महाराचा मी महार या संत चोखामेळा यांच्या रचनांसह नकळे यांना ज्ञान यांना, वृंदावनी वेणू, आधी गीतांनाही रसिकांकडून वन्स मोर मिळाले. अवघा रंग एक झाला रंगी रंगला श्रीरंग या संत सोयराबाई यांच्या अभंगाने कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमात अध्यात्म, शृंगार अशी भक्तिरसपूर्ण गीते आणि विठ्ठल प्रेमाची गोडी रसिकांनी याची देही याची डोळा अनुभवली.

कार्यक्रमाचे संगीत संयोजन जीवन कुलकर्णी यांचे होते. ज्येष्ठ हार्मोनियम वादक जयंत नेरळकर यांच्यासह अमर वानखेडे, राहुल जोशी, गोपाळ खोमणे, निखिल यांनी कार्यक्रमाला सुरेल साथसंगत दिली. ध्वनी व्यवस्था- क्रिस्टल, तर प्रकाश योजना सतीश म्हस्के यांची होती.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी महापौर भगवान (बापू) घडामोडे, शरद भांडेकर, महेंद्र चोपडा, निवृत्त न्यायमूर्ती विजय कुलकर्णी, तनिष्का ग्रुपच्या प्रमुख श्रुती आडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाले. छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदिपान भुमरे, विश्वभारती कॉलनीचे माजी नगरसेवक निळकंठ, पत्रकार डॉ. शेषराव पठाडे, शिवसेना नेते सुनील राऊत, अनिल कोंडापल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती.

# श्रीयश महाविद्यालयात पदवीदान समारंभ उत्साहात संपन्न

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – श्रीयश प्रतिष्ठानच्या श्रीयश इन्स्टिट्युट फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, छत्रपती संभाजीनगर, येथे पदवी व पदव्यत्तर २०२०२०२४ बॅचच्या पदवीदान समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

समारंभाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लि., छत्रपती संभाजीनगर येथील मा. माणिकम पेरुमल (उपाध्यक्ष), डॉ. प्रशांत मुसमाडे (वरिष्ठ व्यवस्थापक), सतीश खराड (व्यवस्थापक) हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्योगातील करिअर संधी, नैतिक मूल्ये आणि व्यावसायिक कौशल्ये यावर मार्गदर्शन करत प्रेरणा दिली. समारंभाच्या अध्यक्षस्थानी श्रीयश प्रतिष्ठानचे चेअरमन बसवराज मंगरुळे होते. प्राचार्य डॉ. गणेश तापडिया यांनी विद्यार्थ्यांना फार्मासिस्ट म्हणून समाजातील योगदानाचे महत्त्व पटवून दिले. आयक्यूएसी प्रमुख डॉ. मिलिंद कांबळे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी शब्दांतून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात बी.फार्मच्या ९५ विद्यार्थ्यांना आणि एम.फार्मच्या १९ अश्या एकूण ११४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

या समारंभात जीपॅट व नायपर परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या या शैक्षणिक यशामुळे संपूर्ण संस्थेचा गौरव वाढला आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनसाठी प्रा. म्हैसमाळे सर आणि प्रा.मिनल चौधरी यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या नियोजनामुळे संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व सुरळीत पार पडला.

सकाळच्या सत्रात माजी विद्यार्थी मेळावा तसेच काही सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले व दुपारच्या सत्रात पदवीदान समारंभ संपन्न झाला. या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना माजी विद्यार्थ्यांनी सांगितले की, महाविद्यालयातील चार वर्षांच्या कालावधीत आणि




पदवी पूर्ण केल्यानंतरच्या पुढील वाटचालीसाठी प्राचार्य आणि सर्व शिक्षक वृंदांनी आम्हाला अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थ्यांचे पालक व पदवीप्राप्त विद्यार्थी उपस्थित होते.

# मजबूत भारत स्थिर जगासाठी संजीवनी : घाना भेटीचा संदेश

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**(मागील अंकावरून)**

आर्थिक सहकार्यांची बैठक


भारताने विकसित केलेली यूपीआय प्रणाली ही जगातील १६ देशांनी स्वीकारली आहे आणि तिचा प्रसार गतीने होत आहे. अमेरिकेसारख्या प्रगत देशाला जे जमले नाही, ते भारताने शक्य करून दाखविले आहे. आता घाना सुद्धा भारताच्या यूपीआय प्रणालीचा स्वीकार करण्याचा विचार करत आहे. घाना आणि भारत या उभय देशांमध्ये कृषी संशोधन विस्तार याबाबतीत सुद्धा परस्पर सहकार्याला मोठा वाव आहे तसेच क्रिटिकल इंजीनियरिंग, खनिज संपत्तीचा शोध आणि भविष्यकाळात माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या क्षेत्रात सुद्धा भारत -घाना सहकार्याची क्षीतिजे व्यापक होणार आहेत. शिवाय घानामध्ये फिनटेक तंत्रज्ञानाच्या विस्तारालासुद्धा मोठी संधी आहे. शिक्षण क्षेत्रात दोन्ही देशातील विद्यापीठे व संशोधन संस्था चांगल्या प्रकारे आदान -प्रदान करू शकतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चार सामंजस्य करारांवर सह्या केल्यानंतर केलेल्या भाषणात पुढील सहकार्याच्या नव्या क्षेत्रांचा विशेष उल्लेख केला आहे.

*समारोप

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा घाना दौरा अनेक अर्थाने उभय राष्ट्रांना वरदान ठरत आहे. सध्या घानामध्ये भारतीय कंपन्यांनी सुमारे ९०० प्रकल्पांमध्ये दोन अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. सध्याची गती पाहता पुढील पाच वर्षांत



दोन्ही देशांमधील व्यापार दुप्पट करण्याचे लक्ष ठेवले आहे आणि ते साध्य करण्यावर उभयतांचा भर आहे. यूपीआय अनुभव शेअर करण्याचा दृष्टिकोन हा घानामध्ये उत्साह वाढविणारा ठरला आहे. भारतीय कंपन्या घानामध्ये खनिजांचा शोध आणि उत्खनन कार्यात सहकार्य करणार आहेत. दोन्ही देशांनी लोकशाही मूल्ये जतन करून दहशतवाद दहशतवादाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी केलेला संकल्प महत्त्वाचा आहे. संरक्षण आणि सुरक्षेच्या दृष्टीने उभय देशातील सहकार्य हे लोकशाही भक्कम करण्यासाठी पोषक ठरू शकेल. सशस्त्र दलांचे प्रशिक्षण, सुरक्षा, संरक्षण साधनांचा




पुरवठा तसेच सायबर गुन्हेगारीवरील नियंत्रण यासारख्या क्षेत्रांत सहकार्य सुद्धा महत्त्वाचे असणार आहे. सध्या जगाला युद्धाची नव्हे तर शांततेची गरज आहे, हे लक्षात घेऊन उभय राष्ट्रांनी पश्चिम आशियातील संघर्ष आणि तणावाच्या पार्श्वभूमीवर जगाला शांततेचे आवाहन केले आहे. मागील ३० वर्षांत घानाला भेट देणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पहिले भारतीय नेते आहेत. त्यामुळे त्यांचा हा दौरा उभय राष्ट्रांमध्ये एक नवा सेतू उभारण्यास पोषक ठरला आहे.

मजबूत भारत स्थिर जगासाठी योगदान देऊ शकेल. घानामध्ये पंतप्रधानांनी दिलेला संदेश महत्त्वाचा आहे. भारत जगामध्ये सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून उदयास आला आहे आणि लवकरच जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनू शकेल, तेव्हा भारताचा आग्रह दक्षिणेकडील सर्व देशांना स्थैर्य देणे हा आहे. जागतिक सुधारणांची गरज भारताने आग्रहाने प्रतिपादन केली आहे. घानाच्या संसदेतील पंतप्रधानांनी केलेले भाषण अत्यंत महत्त्वाचे आहे. मजबूत भारत अधिक स्थिर आणि समृद्ध जगाला हातभार लावू शकेल, अशी आशा पंतप्रधानांनी व्यक्त केली. जगाची सर्वांगीण प्रगती पाहण्यासाठी जागतिक दक्षिणेचा आवाज उठविण्यावर भर दिला पाहिजे. बदलत्या परिस्थितीत जगामध्ये प्रशासनात विश्वासार्ह आणि प्रभावी सुधारणा अंमलात आणण्याची आवश्यकता आहे. जगागील दक्षिणेकडील देशांच्या सर्वांगीण विकासामुळे प्रगतीच्या नव्या दिशा उदयास येतील. हवामान बदलाचे प्रश्न आणि जगातील वाढत असलेला दहशतवाद सायबर युद्ध यासारख्या जागतिक समस्यांना तोंड देण्यासाठी वैश्विक प्रशासनात मोठ्या सुधारणांची आवश्यकता आहे. वसाहतवादी राजकारणाचे डाग पुसून टाकण्यासाठी भारत आणि घाना संयुक्त प्रयत्न करू शकतील याबाबत पंतप्रधानांनी विश्वास प्रकट केला आहे. त्यांचा हा घाना दौरा अनेक अर्थाने ऐतिहासिक दृष्टीने निर्णायक आणि भारताच्या वाढत्या सामर्थ्याचा संदेश देणारा आहे, असे म्हणावे लागेल.

## विशेष लेख...

# मराठी वादात, किती लोक हिंदी व मराठीत बोलतात?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

बऱ्याच वर्षांनंतर महाराष्ट्रात पुन्हा एकदा मराठी विरुद्ध हिंदी असा राजकीय संघर्ष सुरू झाला आहे. केंद्र सरकारचे नवीन शिक्षण धोरण आल्यापासून हिंदी भाषा सक्तीची करण्याची चर्चा सुरू आहे. पण महाराष्ट्रात त्याचे फारसे स्वागत झाले नाही.काही काळापूर्वीपर्यंत देवेंद्र फडणवीस यांचे सरकार हिंदीला तिसरी भाषा म्हणून मान्यता देत होते. परंतु सततच्या विरोधामुळे त्यांना आपला निर्णय मागे घ्यावा लागला आणि आता एक समिती स्थापन करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात सुरू झालेला हिंदी-मराठी वाद आता एका मोठ्या राजकीय संघर्षात रूपांतरित झाला आहे. या वादामुळेच ठाकरे बंधूंना (राज ठाकरे-उद्धव ठाकरे) जवळजवळ दोन दशकांनंतर एकत्र येण्यास भाग पाडले. शनिवारी (५ जुलै) मुंबईतील वरळी डोम येथे झालेल्या विजय रॅलीत राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकाच मंचावर दिसले. या रॅलीचा केंद्रबिंदू मराठी अभिमान आणि हिंदी लादण्यास विरोध होता.

महाराष्ट्रात सुरू झालेले हिंदीविरोधी आंदोलन आता इतर राज्यांमध्येही पोहोचू लागले आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनीही ठाकरे बंधूंच्या पुनर्मिलनाला पाठिंबा दिला आहे आणि हिंदी लादण्याविरुद्ध एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. यापूर्वी महाराष्ट्रात अशा अनेक घटना समोर आल्या आहेत ज्यात जबरदस्तीने मराठी बोलण्याच्या नावाखाली लोकांवर हिंसाचार करण्यात आला होता. महाराष्ट्रात सुरू झालेल्या या भाषा वादाच्या निमित्ताने, देशातील किती लोक हिंदी बोलतात आणि किती मराठी बोलतात ते जाणून घेऊया. त्याची आकडेवारी काय आहे?

**देशात इतके लोक हिंदी बोलतात**

देशातील उत्तर भारतीय राज्यांमधील बहुतेक लोक हिंदी बोलतात, येथील सरकारी कामाची भाषा देखील हिंदी आहे, परंतु आपण दक्षिण भारतीय राज्यांकडे वळताच प्रादेशिक भाषांचा आवाज ऐकू येऊ लागतो. २०११ च्या जनगणनेनुसार, देशाची लोकसंख्या १२१ कोटी होती, जी आता १४० कोटींहून अधिक झाली आहे. यामध्ये, हिंदी भाषिकांची लोकसंख्या ४५ टक्क्यांहून अधिक (४५.११%) आहे. म्हणजेच, देशाच्या लोकसंख्येच्या जवळजवळ अर्धी लोकसंख्या हिंदी भाषिक आहे. २०११ च्या जनगणनेत घेतलेल्या आकडेवारीनुसार, भारतात हिंदी भाषिकांची संख्या ५२,८३,४७,१९३ (५२.८३ कोटी) आहे.

**किती लोक मराठी बोलतात**

महाराष्ट्र किंवा त्याच्या आसपासच्या राज्यांमध्ये मराठी भाषा प्रामुख्याने बोलली जाते. ही महाराष्ट्राची अधिकृत भाषा आहे आणि गोव्यातही मोठ्या प्रमाणात बोलली जाते. जर आपण आकडेवारी पाहिली तर भारतात मराठी बोलणाऱ्या लोकांची संख्या ८,३०,२६,६८० (८.३० कोटी) आहे. ही संख्या भारताच्या लोकसंख्येच्या फक्त ७.०९% आहे. म्हणजेच हिंदीच्या तुलनेत मराठी बोलणाऱ्या लोकांची संख्या खूपच कमी आहे.







## जात्यावरच्या ओव्या......

वाटावरच शेत
नको खाऊ चिमणे बाई,
दादाची एखलपाई
त्याचं येणं होतं नाही ||१५५|

दिवाळीच्या दिवशी
मी तं दिवाळं काढीन,
गाय खुट्याची सोडीन
चोळी अंजिरी फाडीन ||१५६||

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## पंढरीची वारी





विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य


ऊन, वारा, पाऊस या कशाचीच तमा न बाळगता हे वारकरी वारीत चालत असतात. अंगात पांढरे शुभ्र स्वच्छ कपडे असतात. गळ्यात तुळशीची माळ, कपाळावर बुक्का वा गोपीचन्दनाचा टिळा लाऊन ही मंडळी वारीत सामील होतात. वारीमध्ये विविधतेत एकता पाहायला मिळते. जातीभेद, वर्णभेद सगळे गळून पडतात. उच्चनीच भाव नसतो. सारेच एकमेकांना वंदनीय. सारेच विठ्ठलाचे मूर्त रूप. म्हणून सारेच एकमेकांना माउली म्हणून हाका मारीत असतात. एकमेकांच्या पाया पडतात. सगळ्यात मोठी माऊली कोणती ? तर ती विठू माऊली. त्याच्या खालोखाल ज्ञानोबा, तुकाराम आणि इतरही सारे संत या संतानाही माउलीचीच उपमा दिली जाते. कारण संतांचे हृदयच माऊलीचे असते. ऐशी कळवल्याची जाती करी लाभाविण प्रीती. त्यांना कुठलाही स्वार्थ साधायचा नसतो. लोकांनी प्रपंच आणि परमार्थ दोन्ही चांगल्या प्रकारे करावेत अशीच संतांची धडपड असते. आणि प्रपंच करता करता हळूहळू नामस्मरणात रंगून जावे आणि प्रपंचातील लक्ष कमी करत मोक्षमार्गाकडे वाटचाल करावी हाच त्यांचा उद्देश असतो.



वारी म्हणजे परमार्थाचे साधे सोपे सहज शिक्षण देणारी शाळा. आनंदायी शिक्षणाची आज आपण संकल्पना मांडतो. मुलांना कंटाळवाणे, रटाळ किंवा शिक्षा वाटेल असे शिक्षण न देता त्यांना आनंद वाटेल अशा रीतीने शिक्षण देणे म्हणजे सहज शिक्षण. वारी म्हणजे भागवत धर्माची चालती बोलती शाळाच. आनंददायी शिक्षण देणारी. वारीत सामील व्हा. टाळ, मृदुंगाच्या साथीने नामघोष करा. नामस्मरण करताना स्वतःला विसरून जा. जातपात, उच्चनीच कोणतीही उपाधी मनात ठेवू नका. हे सहजशिक्षण वारीतच मिळते. स्त्री पुरुष सगळे भेदभाव विसरून वारीत सामील होतात. वारीत फक्त माणसेच सामील होतात असे नाही तर विविध प्राण्यांचाही लक्षणीय सहभाग वारीत असतो. मग ते अश्व असतील, मेंढ्या असतील. या वेळी तर वारीतील लोकांबरोबर एक हरिणही वाटचाल करीत आहे. हे एक आश्चर्यच आहे.

काही लोक वर्षानुवर्षे नियमाने वारी करणारे आहेत. वारीचा नेम ते चुकू देत नाहीत. किंबहुना वारी चुकू देऊ नकोस असे साकडेच ते विठूरायाला घालत असतात आणि तो विठ्ठलही आपल्या भक्तांचे हे लाड पुरवीत असतो. 'पंढरीची वारी,चंद्रभागे स्नान आणिक दर्शन विठ्ठलाचे ' या तीन गोष्टी वारकरी कधी चुकू देत नाही. एकादशी व्रताचे पालन करतो. अपेयपान, अभक्ष्य भक्षण आणि काम, क्रोधादी विकारांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करतो. नित्य नामस्मरण, भजन, कीर्तन, हरिपाठ यात रममाण होतो तो खरा वारकरी. अशा या वारीचा नेम आणि कडक व्रत महाराष्ट्रातला भाविक वारकरी वर्षानुवर्षे पाळत आला आहे. तो जेव्हा विठुरायाचे दर्शन घेतो तेव्हा फक्त त्याला मनोभावे हातच जोडत नाही तर आपल्या मनातील व्यथा, वेदना, दुःख सारे पांडुरंगाला सांगतो. आपल्या अपराधांची कबुली सुद्धा देतो. आपल्या चिंता त्याच्या पायी वाहतो. माऊली आहे माझ्या पाठीशी आणि तिला सर्व काळजी असे म्हणून तो निश्चिंत होतो. म्हणून विठू माऊली जगण्याचं बळही देते.

***



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## आत्मनिवेदनभक्त


ज्योतिर्मय साहित्य

खरं तर अद्वैत न सोडता भक्ति कशी करावी हे दासबोधाच्या अभ्यासा करताना लक्षात येते. खरं तर भक्ती व ज्ञान वेगळे नाहीत भगवंताच्या सामर्थ्याची, सौंदर्याची, महिम्याची किंमत कळली तर श्रद्धा, भावना, आपलेपणा, दयाभाव निर्माण होतो व माणसाच्या मनात भक्तिचा मळा फुलतो विस्तारतो. म्हणून ज्ञानामृत मिळाले की भक्ति उदय पावते. भगवंताच्या दिव्य, मंगल, मधूर मुर्तीचे, लीलांचे कथांचे आणि नामाचे श्रवण, किर्तन, स्मरण केल्यास मन एकरूप होऊन भगवंताचे अधिक ज्ञान मिळते.

भगवंत शाश्वत आहे. तो सत्तारूप, सुक्ष्म अतीसुक्ष्म आहे त्याचा शोध लागल्यावर आपल्यातील विवेकाच्या जोरावर जगामध्ये असलेल्या अशाश्वत स्थुल, गोष्टी बाजूला होतात वैराग्याचा उदय होतो देहबुद्धी हरते व आत्मबुद्धीचा उदय होतो. व ज्ञानी मनुष्य आनंद सागरात पोहतो. ज्ञानाचा स्वानंदानुभव घेतो. एकदा का ज्ञान मिळाले की

अविद्या संपूर्ण नाश पावते. अखंड समाधाचा मार्ग सापडतो. प्रपंचातील सुखदुःख हे केवळ ज्ञान व भक्तित आहे. हे समजण्याची पात्रता भक्तिने मिळते.

ज्ञानामृत घेत असताना त्यागाची, वैराग्य, तन्मयता, ताजेपणा, नावीन्य सारखाच वाटतो. फरक असा की. माणसाच्या मनातले अज्ञान नाहीसे होऊन ब्रम्हज्ञान प्राप्त होते.तरीपण त्याची भक्ति यत्किंचितही कमी होत नाही. तो कुठल्याही द्वैताला बळी पडत नाही. मित्रांनो अद्वैतभक्ति हीच होय. श्री समर्थाच्या सारखे मुक्त महायोगी, महामानव, महाश्रेष्ठी हा आत्मनिवेदन भक्तिचा स्वानंदरस स्वतः चाखतात व आपल्याला ही तो देतात ह्यासाठी तरी दासबोधाचे चिंतन मनन, आचरण केले पाहिजे. **(क्रमशः)**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## कोणत्याही परिस्थितीत वृत्ती स्थिर ठेवावी

ज्योतिर्मय साहित्य

अमानित्व हा देहाचा धर्म आहे. दुसऱ्याचा मोठेपणा राखून आपला मोठेपणा वाढवावा. दंभ हा मनाचा धर्म आहे. तो दुसऱ्याला फसविण्याकरिता नसावा. स्वत:चे कल्याण करून घेण्यापुरताच दंभ असल्यास हरकत नाही. अहिंसा हा देहाचा आणि मनाचा धर्म आहे. अहिंसा ही हेतूवर अवलंबून असते. वाचेने कोणाचे मन दुखवू नये, आणि देहाने परपीडा करू नये. दुसऱ्याचे दोष सांगणे हे हीनपणाचे लक्षण आहे. लौकिकातला मोठेपणा एका जन्माचा घात करतो, पण दंभ आणि हिंसा अनेक जन्मांचा घात करतात. द्वेषामुळे हिंसा घडते, म्हणून आपण कोणाचाही द्वेष करू नये. कामक्रोधादि सर्वच विकार भगवंताच्या आड येतात, पण वैर आणि द्वेष यांसारखा परमार्थाचा नाश करणारा शत्रू नाही. स्वार्थामुळे द्वेष घडतो. स्वार्थ जायला नामासारखे दुसरे साधन नाही.

आपली वाचा दुसऱ्याला शिकविण्यासाठी आणि मोठेपणा बाळगण्यासाठी नाही. वाचेने म्हणजे जिभेने बोलता येते आणि खाता येते. नेहमी सत्य आणि गोड बोलावे, आणि खाण्याच्या बाबतीत जीभ आपल्या ताब्यात ठेवावी. स्वत:ची चित्तशुद्धी करून घेऊन, संतांचे गुण आपल्या आचरणात आणण्याचा प्रयत्न करावा. अभिमानाचे विष जिथे येते, तिथे नामाची आठवण ठेवावी. हिरण्यकश्यपूच्या ठिकाणी देखील भगवंत नव्हता असे नाही; पण कुंपण फार वाढल्याने शेत दिसेनासे व्हावे, तसे हिरण्यकश्यपूचे झाले. स्वत:च्या ठिकाणी भगवंत आहे हे हिरण्यकश्यपू अभिमानामुळे विसरला. त्यामुळे भगवंताला खांबात दिसावे लागले. अभिमान जरुरीपुरताच ठेवावा. ' मी रामाचा आहे ' असा अभिमान धरावा. नामाची कास धरावी. ' नारायणाचे दर्शन व्हावे ' असे नाही प्रह्लाद म्हणाला, ' नाम नाही सोडणार ' असे म्हणाला. लहानपणाची वृत्ती चांगली असते. लहानपणात चूक नाहीच, आणि सगळा फायदाच असतो. भगवंताजवळ आपण लहान मूल झाल्याशिवाय त्याला कृपेचा पान्हा फुटणार नाही; म्हणून आपण भगवंतापाशी लहान व्हावे. लहानपण हे वयावर अवलंबून नसून, आपल्या वृत्तीवर अवलंबून असते. कोणाविषयीही वाईट विचार मनात आणू नयेत; त्यापासून आपलेच मन गढूळ होते. ' माझा प्रपंच जसा व्हायचा असेल तसा होवो, पण तुझा विसर मला पडू देऊ नकोस, ' असे परमेश्वराला अनन्यतेने म्हणावे. मला खात्री आहे, तो तुमच्या साहाय्याला आल्यावाचून राहणार नाही.

वृत्ती स्थिर करण्यासाठी तिला स्थिर वस्तूवर चिकटवून ठेवली पाहिजे. भगवंत ही अशी एकच वस्तू स्थिर आहे.

## || संत महात्म्य ||

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### संत श्रेष्ठ श्री नामदेव महाराज यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

त्रिकूट शिखरावरी पांहे पा नवल /
परी अखंडित धार वर्षे अमृताची//१//
त्रिवेणी संगमी गगन निर्मळ वाहे/
तेथे स्नान करू जाय आनंदमय //२//
गुरुमुखे स्नान करी परब्रम्ही लक्ष धरी/
अनुहात ध्वनी थोरी नाद गरजे//३//
उन्मनी जागृती गोल्हाट मंडळा जाय/
तेथून निराळ पाहे निजतत्वा//४//
विष्णुदास नामा म्हणे अनुभवी तोच जाणे/
आम्ही गुरु खुणे वर्ततसे//५//

संतश्रेष्ठ श्री नामदेव महाराज यांचा हा एक गुढ असा अभंग आहे. खरे तर हा त्यांचा आत्म ज्ञानाचा अनुभव त्यांनी शब्दबद्ध केला आहे.

या अभंगाच्या भावार्थाला स्पर्श करण्याचा एक अल्पसा प्रयत्न आज आपण करूयात.

आपण पाहतो की आपल्या जीवनातही अनेक प्रकारची द्वंदे आहेत जसे काळा, गोरा सत्य असत्य, दिवस रात्र, ब्रह्म माया ,सूर असुर, देव दानव, या जशा विरुद्ध स्वभावतः असणाऱ्या जोड्या आहेत, तसेच तीन-तीन असणाऱ्या अशाही जोड्या आहेत याला त्रिकूट म्हणतात. उदाहरणार्थ वात कफ पित्त ,ध्यान ध्याता व ध्येय, ब्रह्म माया जीव, जगत जगदीश जीव, सत्व रज तम.

हे त्रिकुट किंवा तिळे हे स्वभावतः समान नसते.यात एक किंवा दोनचा भाव ,प्रमाण हे तिसऱ्या पेक्षा कमी अधिक असतो. उदा.शरीरात वात,पित्त व कफ हे सम प्रमाणात असले तर मनुष्य निरोगी असेल पण यातील एखादा तरी घटक कमी अधिक होतो व संतुलन बिघडते व आजारपण येते.

सत्व रज व तम हे भावाचेही असेच आहे.हे तीन गुण माणसाची वृत्ती ठरवितात.सत्व गुण प्रधान असेल तर माणूस सात्विक, रजो गुण प्रधान असेल तर उद्योगी पण विकारी व तमोगुण प्रधान असेल तर हव्यास असणारा, हिंस्र वा दुराचारी असतो.तसा जन्मतः माणूस हा रजोगुणी असतो कारण त्याचा जन्मच मुळात रज रेता पासून झालेला औअसतो.

सत्व गुण अधिक असला तरी व्यक्ती परोपकाराची कामे करेल त्यातून पुण्य कमावेल व त्या पुण्याचा भोग घेण्या साठी पुन्हा पुन्हा जन्म घेईल.या शिवाय पुण्य कर्म आपण करतो आहोत याचा सुद्धा एक अहंकार असतो व तो वाढत जातो.

आपल्यात देह भावना प्रबळ आहे म्हणून आपल्या हातून जी कर्मे घडतात त्या कर्माला आपण बांधले जातो. हा देह म्हणजे मी ही भावना इतकी प्रबळ झालेली असते की या देहातून होणारी कर्मे ही जणू आत्म्या तर्फेच घडली आहेत असा चुकीचा समज जीव करून घेतो, आणि म्हणून ही कर्मे भोगणे त्याला क्रमप्राप्त होते. प्रारब्धा नुसार आलेली कर्मे भोगता भोगता नवीन कर्मे तयार करतो व पुन्हा संचित कर्मात भर टाकत जन्मोजन्मी हा जीव याच जन्म मृत्यूच्या फेऱ्यात अडकून पडतो. म्हणून हा जीव देहातीत व्हावयास हवा आणि देहातीत होण्यासाठी या त्रिकूटावर त्यास विजयप्राप्त करता यायला हवा. या त्रिकुटाचे समत्व म्हणजेच त्यावर विजय मिळवणे होय. ज्यावेळेस तीनही गुण संपतील तेव्हाच शुद्ध सत्व भाव जागृत होतो. जेव्हा असा भाव जागृत होतो त्या वेळेसच तो त्रिकुटाच्या शिखरावर पोहोचला असे समजावे. या स्थितीलाच ब्रह्म स्थिती प्राप्त झाली असेही म्हणतात.

अशा सम भावात स्थिरतेने राहू शकणारे स्थान म्हणजे आपले सहस्त्रार चक्र होय.

**(क्रमशः)**

## || निरूपण ||



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं विश्वात्मिके नमो नमः।**
**अमित्राणां विनाशिन्यै शक्त्यै तुभ्यं नमो नमः।। ३२।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो.विश्वात्मिके, तुला नमस्कार असो. शत्रूंचाविनाश करणारे शक्ते, तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं वञ्चकनाशहेतवे।**
**असत्यवक्तृनाशाय चण्डि तुभ्यं नमो नमः।। ३३ ।।**

फसवणूक करणाऱ्या लोकांच्या नाशासाठी जगदंबिके, तुला नमस्कार असो. असत्य बोलणाऱ्या लोकांच्या नाशासाठी हे चण्डी, तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं यशदायिनि ते नमः।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं कीर्तिप्रदे नमो नमः।। ३४ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. यशदायिनी अशातुला नमस्कार असो. जगदंबिके, तुला नमस्कार असो. कीर्तीदायिनी अशा तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं ममारिनाशहेतवे।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं मे सुहृदां हिताय च।। ३५ ।।**

माझ्या शत्रूंच्या नाशासाठी जगदंबिके, तुला नमस्कार असो. माझ्या मित्रांच्या हितासाठी जगदंबिके, तुला नमस्कार असो.





## अक्रोड...

ज्योतिर्मय साहित्य

विविध प्रकारच्या ड्राय फ्रुटमधले हे एक दर्जेदार, पौष्टिक फळ आहे, अक्रोडात अनेक आरोग्यदायी गुणधर्म आढळत असून शरिराची रोगप्रतिकारशक्ती

वाढवण्यासाठी हे अतिशय फायदेशिर आहे.

अक्रोडला ''ब्रेन फूड'' असे म्हणतात. अक्रोडात खुप प्रकारचे विटामिन असतात, जसे कि, विटामिन , , , १२, विटामिन , म्हणूनच याला विटामिनचा राजा म्हणतात.

अक्रोड आपल्या मेंदूसाठी खुपच फायदेशिर आहे. हे जवळपास मानवी मेंदू सारखेच दिसते, याच्या सेवनाने मानसिक ताण दूर होतो, मन प्रसन्न होते, बौद्धिक पातळी वाढते( . .). स्मरणशक्ति वाढते, अक्रोडात शक्तिशाली न्यूरो प्रोटेक्टिव कंपाउंड सारखे विटमिन . -३ व एंटि ऑक्सिडंट असतात. ज्यामूळे मेंदूला सुरक्षा मिळते.

अक्रोड हे हृदयासाठीही लाभदायक आहे. याच्या सेवनाने शरिरातील चरबी कमी होते, कोलेस्ट्रोल नियंत्रणात राहते. कारण ओमेगा-३ फॅटि एसिड जे हार्टकरता उपयोगी आहे, ते विपुल आहे, अक्रोडात या कॅंसरविरोधि घटकाचे प्रमाण जास्त असते त्यामूळे दररोज अक्रोड खाल्ल्यामुळे ब्रेस्ट कॅंसर, प्रोस्टेट कॅंसर, व मलाशयाचा कॅंसर होण्याचा धोका कमी होतो,

अक्रोड खाण्यामुळे भूक कमी लागते, त्यामुळे वजन कमी करण्यासाठी उपयोग होतो, व याच कारणामूळे डायबेटिस२ आटोक्यात राहतो, अक्रोडामूळे रक्तातील साखर नियंत्रित राहते. उच्च रक्तदाब आटोक्यात राहतो. अक्रोड हा दुर्बल, अशक्त व्यक्तिकरता खूपच लाभदायी आहे, सकाळी उठून २-३ अक्रोडाचे सेवन करावे, वरून एक कप दूध घ्यावे.

ज्या पुरूषांमध्ये शुक्रजंतू कमी असतात, ज्यामूळे ते प्रजोत्पादन करू शकत नाही, अशांनी नियमित अक्रोडाचे सेवन केल्यास फायदा होतो, अक्रोड हे वातघ्न असल्याने संधिवात, सायटिकि,

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

सांधेदुखी, आमवात, या आजारावर चांगले परिणाम देते. ज्यांना गुडघे दुखीचा तीव्र स्वरूपात त्रास आहे त्यांनी सकाळी उठुन ३-४ अक्रोडाचे सेवन करावे.

अक्रोडाचे तेल नियमित सेवन केल्यास, आतड्यातील कृमी नाश पावतात व शौचावाटे बाहेर पडतात. अक्रोड हे सारक गुणधर्माचे असल्याने बद्धकोष्ठ, मलावरोध असणाऱ्यांनी अक्रोडाचे नियमित सेवन करावे, यात फायबर विपुल असल्याने वरिल त्रास होत नाही.

अक्रोड वनस्पतीची साल व पाने गंडमाळा, पुरळ, उपदंश, व त्वचारोग आदि रोगावर उपयोगी आहे.

अक्रोडाचि पाने कृमीनाशक आहे.

चेहऱ्यावरील काळे वांग, पिगमेटेशन, पुरळ असणाऱ्यांनी, अक्रोड बारिक वाटुन त्याचा लेप लावावा, चेहरा सुंदर होतो, अक्रोड बीज तेल हे साबण, व सौंदर्यवर्धक गोष्टित वापरतात, सहसा जेवणानंतर अक्रोड खावा, यामूळे जेवणाचे पचन चांगले होते. अकाली केस पांढरे होणे, केस गळणे या तक्रारिंवर, अक्रोड सिद्ध तेल वापरल्यास केस काळेभोर, व दाट होतात, .

तेव्हा अशा या भरपूर गुणांनी युक्त सुक्या मेवाला आपल्या दैनंदिन आहारात जरूर, सामील करावे.

***

## ||श्री राम कथा||





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

निर्माण झालेल्या परिस्थितीला खाली दाबून, त्यावर आरूढ होणे याला उदासीन म्हणतात.(ऊत आसन=उदासीन) परिस्थितीतून बाहेर होऊन विचार केला की ती परिस्थिती क्षुल्लक वाटते. राम म्हणाले मला वनवासात जाण्याची आज्ञा झाली आहे.ती म्हणे मग चला... राम म्हणे आदेश मला आहे, तुला नाही.सीता म्हणे मी सोबत येणार. ती ऐकेना. तिने रामास माझे बरोबर येणे किती बरोबर आहे हे त्या पटवून देऊ लागली. सीता शेवटी रडू लागली.ती ऐकेना.शेवटी ते तयार झाले.ते म्हणाले आपण १४ वर्षे राज्य सोडून जात आहोत.येथील वस्तू दागिने यात मोह ठेऊ नको. वस्त्र डाग दागिने यांचे दान कर.निर्मम होऊन सोबत चल.वसिष्ठांचे पुत्र सुयज्ञ होते त्यांचे करावी संकल्प सोडला सर्व वस्त्रे दाग दागिने दान केले व निघाले.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

दशरथ खूप विलाप करतात. वारंवार मूर्च्छित होतात.कैकयीला सुमंत समजवण्याचा प्रयत्न करतात.पण तिच्या मनात दयेचा भाव नव्हता.दशरथ रामास म्हणतात मी तुझ्या सोबत येतो. वसिष्ठ कैकयीस खूप रागावतात.पण कैकयीचे ऋदय द्रवले नाही. शेवटी वल्कले नेसून राम सीता व लक्ष्मण निघाले.कौशल्याने सीतेला पातिव्रत्य धर्माचा उपदेश केला तो श्रद्धेने तिने ऐकला.राम सुमित्राआईस म्हणाले तू बाबाकडे यांनी मला वनात पाठविले म्हणून दोष दृष्टीने पाहू नकोस.ती तिचा मुलगा लक्ष्मण यास म्हणाली की तू माझ्या पोटात होतास तेंव्हा मी ज्येष्ठांची सेवा करावी वाटते ,हा डोहाळे सांगितला होता.तू ज्येष्ठ बंधूंची अहोरात्र सेवा कर. **(क्रमशः)**

## फुलमाला....



जाई...

हिरव्या वेलीवर फुलती
शुभ्र फुले ही जाईची
सायंकाळ होता उमलती
लयलूट करती सुगंधाची

या फुलांपासून बनविती
औषध, तेल आणि अत्तर
देवाचरणी यांचे रूप फुले
कुंतली गजरा शोभे निरंतर...

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज.


# चातुर्मासातील कहाण्या

**ज्योतिर्मय साहित्य**

चातुर्मासात काही नियम मी पूर्ण करण्याचा प्रयत्न कारणार आहे. त्यामधील हा एक नियम .. संपूर्ण चातुर्मास या पुस्तकातील कहाण्या मी अगदी लहानपणापासून ऐकत/ वाचत आले. काळ बदलला,जीवनशैली बदलली पण माणूस तोच राहिला.त्या मुळे या काळातही त्यातील कितीतरी कथांचा अर्थ गंध मनात दरवळत राहतो..आजपासून अधून मधून मला या पुस्तकातील आवडलेल्या काही कहाण्यांबद्दल माझ्या भावना मी शब्दात मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. पहिली कहाणी गणपतीची... कुठलीही सुरुवात करताना प्रथम पूजेचा मान गणेशाला मिळालेला आहे हे आपण सर्वजण जाणतोच.

या कथेची सुरुवातच खूप छान आहे.गणेशालाच त्याची कहाणी सांगायची आहे.निर्मळ मळे, उदकाचे तळे, बेलाचा वृक्ष, सुवर्णाची कमळे, विनायकाची देवळे रावळे..मनाचा गणेश मनी वसावा..

हे किती अर्थपूर्ण छान आहे. सुरुवातच समृद्ध संपन्नतेने केलेली आहे.परत मनाचा गणेश मनी वसावा यात ही वेगळे काही करायचे नाही आहे..मनानेच मनातल्या गणेशाची पूजा करून वसा घ्यायचा आहे..त्याचा सुरू करण्याचा आणि संपविण्याचा ठराविक अवधी दिलेला आहे. म्हणजे एखादी गोष्ट/उपक्रम आपण हाती घेतला तर तो योग्य काळातच संपविला पाहिजे.संपूर्णाला काय करावं?




**॥ अध्यात्म ॥**

सौ.माधुरी म.इनामदार
मिरज. मो. 78755 99497




पशा पायलीचे पीठ कांडाव. अठरा लाडू करावेत. या ओळीत स्वतः श्रमदान करणे अपेक्षित आहे.सहा देवाला द्यावे, सहा ब्राम्हणाला द्यावे, सहांच सहकुटुंबी भोजन करावे..या मध्येही किती छान अर्थ आहे. तिन्हीचेही समान भाग आहेत. देवाला तर आपण नैवेद्य दाखवतोच..त्या काळी ब्राह्मणांचा उदरनिर्वाह केवळ वैदिक, पूजा अर्चा यावरच चालत असे. त्यामुळे त्याला सहा लाडू. आणि उरलेल्या सहा लाडवात संपूर्ण कुटुंबांनी भोजन करायचे आहे. त्याकाळी एकत्र कुटुंब होती त्यामुळे छोट्या वाट्यातही तृप्तता असावी असे सांगण्याचा उद्देश असावा.


अल्पदान महापुण्य. म्हणजे काय जितके आपल्या ओंजळीत आहे त्यातील थोडे नक्कीच दुसऱ्याला दिले तर पुण्य मिळते.

असा गणपती मनात नीट चिंतन करून बसविला आणि त्याची अशी मनापासून पूजा केली तर तो नक्कीच पावतो.

याचा अर्थ कुठलीही गोष्ट मनापासून, वेळेत पूर्ण करून त्याचा आनंद सर्वांना वाटून आपणही घेतला तर नक्कीच समाधान मिळते..

ती साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण. (या ओळीचा शब्दशः अर्थ मला समजत नाही. तरीही मला ही खूप आवडते)





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

## भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी रवींद्रनाथ – भाग दोन

बरे झाल्यानंतर त्यांनी नेपल्स, इटली, स्विझर्लंड या देशांना भेटी दिल्या. त्यातही अनेक लोकांना ते भेटले. नंतर पुन्हा १९२७ मध्ये ते विविध देशांच्या दौऱ्यावर बाहेर पडले. या त्यांच्या दौऱ्यात सिंगापूर, इंडोनेशिया आदी देशांचा समावेश होता. या दौऱ्यात त्यांच्याबरोबर सुप्रसिद्ध भाषा शास्त्रज्ञ प्रोफेसर सुनीती कुमार चॅटर्जी आणि चित्रकार सुरेंद्रनाथ कार हे दोघे होते. ईस्ट इंडीज मधील वास्तव्यात चित्रकार सुरेंद्रनाथ यांना तिथे कापडावर छापलेली एक डिझाईन खूप आवडली. तिला बाटीक असे म्हटले जात होते. एका विशिष्ट पद्धतीचा वापर करून वक्ररेषांमुळे तयार झालेल्या या मनोवेधक प्रकाराला स्वतःचे असे खास सौंदर्य आहे. सुरेंद्रनाथ यांनी ते बाटिक तंत्रज्ञान आत्मसात केलं आणि आपल्या सोबत श्रीनिकेतनला आणलं. तिथे त्यांनी ही कला शिकवली. या कलेच्या सौंदर्याने लोकांना तिच्याकडे आकर्षित केले आणि आता तर एक आधुनिक डिझाईन म्हणून या कलेला खूपच लोकप्रियता मिळाली आहे.

नंतर त्यांना कॅनडाला येण्याचे निमंत्रण मिळाले. महान साहित्यिक म्हणून लोक रवींद्रनाथांना ओळखत होतेच पण आता रवींद्रनाथांची कीर्ती एक महान शिक्षणतज्ज्ञ म्हणूनही पसरली होती. त्यामुळे त्यांना एका अधिवेशनात शैक्षणिक समस्यांवर चर्चा करण्यासाठी बोलावले गेले. त्यांचे कॅनडातील वास्तव्य फक्त दहा दिवसांचे होते. त्यावेळी कॅनडातील श्रीमंत लोकांना एक छोटासा पंखा हातात बाळगण्याची सवय होती. चाहत्यांच्या आग्रहामुळे रवींद्रनाथांना या पंख्यावर सही करणे भाग पडत होते. ती सही करताना ते काही स्वरचित ओळी त्यावर लिहून देत. त्यांच्या या अशा त्यांच्या छोट्या रचनाही एक पुस्तक सहज प्रकाशित होईल इतक्या जमा झाल्या. आणि त्यांचे पुढे फायर फ्लाईज ( विचारांच्या छोट्या ठिणग्या ) नावाचे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यातील एक रचना उदाहरण म्हणून या ठिकाणी पाहू.

'' दिवस म्हणजे रंगीबेरंगी बुडबुडे.
रात्रीच्या अथांग पृष्ठभागावर तरंगणारे...''

यादरम्यान युरोप अमेरिकेत त्यांच्या चित्रांची प्रदर्शने भरली. त्यांच्या चित्रकलेच्या नवीन वैशिष्ट्याने लोकांचे लक्ष वेधून घेतले. खरंतर वयाच्या साठाव्या वर्षानंतर रवींद्रनाथांनी चित्रकला शिकायला सुरुवात केली होती. आपल्या लेखनात दुरुस्त्या करत असताना ते त्यात लय साधलेला एखादा आकार काढत आणि मजेशीर आकृत्या तयार होत. मग त्यांनी चित्रे काढायला सुरुवात केली. आणि कलेच्या या प्रांतात लेखणी आणि कुंचला (ब्रश) या दोन्हींचाही वापर ते करू लागले. आणि ओघानेच इतर चित्रेही रेखाटू लागले. त्यांच्या या अनोख्या शैलीच्या रंगचित्रांमुळे युरोपीय जनतेत त्यांच्या चित्रांबद्दल आकर्षण निर्माण झाले. याविषयीची दुसरी बाजू अशी म्हणता येईल की आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात देखील नवनवीन गोष्टी शिकण्याची आणि प्रयोग करण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती त्यांच्याजवळ होती. त्यांच्या सृजनशील मनाची प्रगल्भता यात आपल्याला आढळून येते.

(क्रमशः)

**ऑनलाईन औषधोपचार**



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# किलबिलमध्ये रंगला दिंडी सोहळा

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई** – वारकऱ्यांच्या वेशभूषेतील लहान मुले, पालखी मिरवणूक आणि विठू नामाचा गजर अशा वातावरणात शहर आणि परिसरातील विलेपार्लेच्या किलबिल बालवाडीमध्ये आषाढी एकादशी निमित्त आयोजित दिंडी सोहळा विशेष रंगला. विठ्ठल-रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम व अन्य संतांच्या वेशभूषा केलेले विद्यार्थी हे आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले. बाल वारकरी दिंडी सोहळ्याचे नागरिकांनी ठिकठिकाणी स्वागत केले.



मराठी शाळेसाठी व भाषेसाठी झटणाऱ्या श्री पार्ले टिळक विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका सौ.छाया गाडे यांनी विलेपार्लेत सुरु केलेली खास मराठी किलबिल बालवाडी दखलपात्र ठरत आहे. या शाळेतील लहान मुलांनी आषाढी एकादशीनिमित्त आयोजित दिंडीत टाळ मृदुंग व विठू नामांनी पालखी मार्ग निनादला. उत्कृष्ट तयारी वारकरी पोषाखात सकाळी लवकर पालक मुलांसह तयार होते. यावेळी माजी विद्यार्थी अर्चित दादा व त्यांच्या मातोश्रीने खूप सहकार्य केले. या आकर्षक दिंडीमुळे वातावरण प्रफुल्लित झाले होते. या दींडी सोहळ्याने एक वेगळा रंग आला. किलबिल बालवाडी बहरली. शैक्षणिक वर्षाची शानदार सुरुवात झाली. किलबिल बालवाडीच्या मुख्याध्यापिका छाया गाडे, किरण निनगुरकर, लेखक आशिष निनगुरकर, कविता खेडेकर, आरोही पाष्टे, श्रुती कुडाळकर, सोनु शिवगण, मिनाली साहू, प्रदीप महानगोरे, चन्द्रिका मॅडम आदींची विशेष उपस्थिती होती. किलबिल बालवाडीतर्फे काढण्यात आलेली ही दिंडी लक्षवेधी ठरली. छाया गाडे मॅडम यांनी यावेळी वारकरी संप्रदायाबद्दलची माहिती दिली. कार्यक्रमाची प्रस्तावना कविता खेडेकर तर आभार किरण निनगुरकर यांनी मानले.

मराठी भाषा व मराठी शाळेसाठी झटणाऱ्या छाया गाडे यांच्या कामाचे सर्वांनी कौतुक केले.

# मी पाऊस बोलतोय....

**ज्योतिर्मय साहित्य**

हॅलो ! हं मी पाऊस बोलतोय. हो हो बरोबर ऐकलत मी पाऊस बोलतोय. काय म्हणता ? पावसामुळे नीट ऐकू येत नाही आहे ? मला तुम्हा लोकांची गंमतच वाटते. सारखी आपली किरकिर करत रहायची सवय आहे तुम्हाला. मे महिन्यात उकाडय़ामुळे हैराण झालेले असता ना, तेव्हा कधी पाऊस पडेल म्हणत असता. लगेच मान्सून अंदमान, केरळमध्ये कधी दाखल होणार पासून ह्यावर्षी किती टक्के पाऊस होईल याची गणितं मांडायला लागता तुम्ही लोकं.



आणी जूनमध्ये सुरवात झाली की दोन दिवस सगळ्यांच्या व्हॉट्सऍप स्टेटसवर रिमझिम गिरे सावन, टिपटिप बरसे पानी, बरसो रे मेघा मेघा इत्यादी पावसाची गाणी. धबधब्याची दृष्य, टपरीवरचा चहा, कांदा भजी, भाजलेली कणसं अगदी पूर येतो नुसता. आणी काय हो

तेरड्याचा रंग तीन दिवस ह्या म्हणीप्रमाणे तुम्हा लोकांचा उत्साह तीन दिवस टिकतो. नंतर सुरू होते तुमची बडबड, काय हा पाऊस वैताग आणलाय नुसता. सगळीकडे नुसतं पाणी साठलय, गाड्या बंद पडल्या आहेत, लोकल उशीराने येत आहेत, आज लेट मार्क लागणार. मला सांगा पावसाने (म्हणजे मी) तुमच्या इच्छेप्रमाणे, तुमच्या सोयीनुसार यायचे का ?

शेखर देशपांडे
छत्रपती संभाजीनगर

हे बघा, नाही आधी मी काय म्हणतो ते ऐकून घ्या. मी पाऊस आहे माझं काम आहे पडण्याचं. कधी, कुठे, किती पडायचं माझ्या हातात नसतं. वरून ऑर्डर येईल त्याप्रमाणे मी येतो, रिमोट कंट्रोलवर चालतं सगळं. रिमझिम, भुरभुर, मुसळधार अशा स्वरूपात माझं जाणं येणं चालू असतं. पण मला तुम्हा लोकांच हे कळत नाही तुम्हाला पाण्याचं नियोजन नीट करता येत नाही का? जंगलतोड करून तुम्ही टॉवर उभे करत सुटलात, सगळीकडे धूराचं व धूळीचं साम्राज्य, कचऱ्याचे ढिग पसरलेले दिसतात निसर्गाचा समतोल बिघडवून टाकला आहात तुम्ही. आणी नुसतं पावसाच्या नावाने शंख करायचा.

हे बघा मी सगळीकडे जाऊन सगळ्यांना सुखी समाधानी करण्याचा प्रयत्न करतो. हां विदर्भ, मराठवाडयाकडे माझ्याकडून होतं थोडं दुर्लक्ष पण काय करणार नाही साधला जात समतोल. अहो परवा छत्रपती संभाजीनगरमधल्या एका माणसाला मी देवाकडे साकडं घालताना पाहिलं, तो म्हणत होता हे देवा आमच्या इथे पाऊस कमी झाला तरी चालेल पण नाशिकला पाऊस चांगला होऊ दे, का तर जायकवाडीला पाणी येईल म्हणून. बरं बरं ठीक आहे, बघा मी सांगीतलेल्या गोष्टी समजून घ्या. बरं आता देऊ का ठेवून ? अहो म्हणजे तसं नाही हो, गैरसमज नका करून घेऊ. मला असं म्हणायचं होतं फोन ठेवू का ?



## इंदापूरी निखारे

## प्रामाणिक चोर...



**ज्योतिर्मय साहित्य**

असाच एक पावसाळ्याचा दिवस होता. ऑफीस मधे बसुन युवराजने मारलेल्या सहा सीक्सेसचे वर्णन पेपर मधे वाचत होतो. मस्तच, पाहिल्या होत्याच पण वेगवेगळे एक्सपर्ट काय म्हणत होते ते वाचत होतो, एव्हढ्यात ऑफिसमधे धाडकन दरवाजा उघडुन तो आत आला अन खुर्चीवर बसला, चेहरा रक्ताने माखलेला, तीनचार जखमांमधुन रक्त वहात होते, त्यात डोळ्यातुन येणारे अश्रु काहीतरी बोलायचे आहे म्हणुन वहात होते, ते मला जाणवले, मी पटकन पेपर बाजुला केला आणि पत्नीला हाक मारुन हळद , आयोडीन घेऊन बोलाविले. ऑफीस घरामधेच होते. त्याला पाणी प्यायला दिले, आयोडीनने जखमा पुसल्या आणि हळद लावायला दिली. तोपर्यंत पत्नी हळद दुध घेऊन आली, ते त्याला प्यायला लावले. थोडा शांत झाला, स्थिरावला !

काय झाले ? मी विचारले
तो काहीच बोलला नाही .
रक्त येण्याचे थाम्बले होते ! पण
डोळ्यातुन येणारे अश्रु
आता दुसरेच काहीतरी बोलत होते !
आणि ते मला जाणवले.
मी त्याला धीराचे काहीतरी बोललो .

थोडा विश्वास त्याच्या डोळ्यातुन येणाऱ्या अश्रुमधे मिसळुन गेला .

काही पैसे पाहिजे का ? हा प्रश्न विचारायच्या आधीच मनात ठरविले होते की याला आपण १०० रुपयापर्यंत मदत करू शकू !

तो बोलू लागला, बरेच काही बोलला पण आत्मविश्वासाने, आणि मला म्हणाला ...

तुमची माझी काही ओळख नाही ,मी कोण आहे ? हे पण विचारले नाही, म्हणुन मीच सांगतो, मला माहीत आहे, हे तुम्ही विचारणार पण नाही.

तर मी चोर आहे साहेब ! मला १५ रुपये द्या साहेब .बस यापेक्षा जास्त काही बोलत नाही .

अरे , पण १५ रुपयात ....

माझे बोलणे मधेच तोडत म्हणाला, नाही साहेब फक्त १५ च रुपये !

मी त्याला १०० रुपयाची नोट दिली, जे मी आधीच ठरविले होते, मनातल्यामनात, सुट्टे करुन आण आणि घे १५ रुपये.

माझी पत्नी आत जाता जाता मला म्हणाली, तो स्वतःहून सांगत आहे मी चोर आहे , तरीपण त्याच्यावर विश्वास, वाट बघा त्याची .मी म्हणालो, मी १०० रुपयेच देणार होतो.

थोड्याच वेळात तो आला. मला ८५ रुपये देऊ लागला, मी म्हणालो, राहू दे, लागत असतीलच .

तो ठामपणे म्हणाला नाही .एक मिनिट थाम्बा, मी पत्नीला हाक मारली आणि त्याला म्हणालो दे त्यांच्याकडे .....

तो निघाला ....
तिघांच्या डोळ्यातले अश्रु
आनंदाने, समाधानाने
एकमेकांना पहात वहात होते
किंम्मत न करता येणारे अश्रु एकमेकांचा
निरोप घेत होते

https://jyotirmaysahitya.com
ही लिंक उघडेल साहित्याचे दार
ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ

ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ



**आठवणीतले बालपण**

*मित्रांनो, प्रत्येकाच्या आयुष्यात बालपणीचे विशेष महत्व असते, रम्य ते बालपण, खरंच बालपणीसारखी मज्जा परत कधीच येत नाही आता ते दिवस आठवले तरी मन खूप प्रसन्न होतं, तर आपण सर्वजण परत एकदा त्या बालपणीच्या विश्वात जाऊया, त्या आठवणींना एकदा उजाळा देऊयात ज्योतिर्मयच्या माध्यमातून. मग लिहायला सुरुवात करा व पटकन पाठवा मला 7743918559 या व्हाट्सअप नंबरवर*

*- संजय व्यापारी, संपादक, ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ.*

# सातारकरांचे अनिल वाळिंबे

ब-याच वर्षापूर्वी अनिल वाळिंबे यांच्या घरी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना भेटण्यासाठी मी गेलो होतो. सातारला बाबासाहेब यायचे ते मुख्यतः अनिल वाळिंबे यांनाच भेटण्यासाठी आणि गप्पा मारण्यासाठी, असे त्या काळात बऱ्याच वेळा बाबासाहेबांचे ठरलेले असायचे. मी त्यांच्याशी गप्पा मारत होतो असे म्हणण्यापेक्षा ते बोलत होते आणि मी ऐकत होतो. त्यावेळी माझ्याबरोबर कोण होते हे आठवत नाही. बोलता बोलता बाबासाहेब पुरंदरे म्हणाले.... माझे आत्मचरित्र जेव्हा मी लिहीन त्यावेळी त्या आत्मचरित्रात बरीच पाने अनिल वाळिंबे यांनी व्यापलेली असतील. अजूनही हे बोलत असलेले बाबासाहेब पुरंदरे मला समोर दिसतात. काही प्रसंग आपल्या आयुष्यामध्ये असे घडतात की ते प्रसंग आपल्या मनात ठाण मांडून बसलेले असतात. आपल्या आयुष्यात काही व्यक्ती येतात आणि आपले आयुष्य संपन्न करीत असतात. त्यातीलच माझ्या आयुष्यामध्ये ज्या काही व्यक्तिमत्वांमुळे माझे आयुष्य संपन्न झाले त्यातीलच एक व्यक्तिमत्व म्हणजे अनिल वाळिंबे. आज वयाची ८५ वर्षे पूर्ण करीत असताना अनिल वाळिंबे यांनी आपल्या गुणवैशिष्ट्याने सातारकरांचे प्रेम संपादन केले आहे. कविवर्य बा.भ. बोरकर यांच्याबद्दल असे म्हंटले जायचे कि, ते कवितेच्या तंद्रीत बुडून असायचे. अष्टौप्रहर कवीच असायचे. त्यांची तंद्री आश्चर्यमुग्ध करणारी होती; पण अस्वस्थ करणारी नव्हती. वागण्यातल्या अस्वाभाविकतेपेक्षा कवितेतल्या उत्कट आवेगातच तिचं रूपांतर झालेल जाणवायचं. अनिल वाळिंबे यांच्या गाणी आणि संगीताबद्दल असेच म्हणता येईल. संगीत आणि गाणी हा त्यांचा ध्यास आणि श्वास आहे. या संगीतवेडाने ते लता मंगेशकर, आशा भोसले, उषा मंगेशकर, हृदयनाथ मंगेशकर या कुटुंबातीलच एक घटक समजले जातात. मंगेशकर कुटुंबियांच्या कोणत्याही गाण्यांची माहिती आपणाला सहजपणे त्यांच्याकडे मिळते. मंगेशकर कुटुंबियांनाही काही संदर्भ हवे असतील, जुन्या गाण्याचे रेकॉर्डिंग हवे असेल तर ते अनिल वाळिंबेशी संपर्क साधतात. माझे मित्र विजय पवार जे साऊंड व्यवसायात आहेत तसेच संगीतप्रेमी आहेत ते सांगत होते... एल. पी, एस.पी, इ. पी आणि कॅसेट, सी.डी. यांचा मोठा खजिना वाळिंबे सरांकडे असून या दुर्मिळ जुन्या गाण्यांची किंमत करावयाची झाली ती लाखो रुपयांची आहे.

असं म्हणतात की, भाषेच्याही आधी संगीत निर्माण झालं आहे. साता-याची संगीतातील, गाण्यातील जाण समृद्ध करण्यामध्ये अनिल वाळिंबे यांचे अनन्यसाधारण योगदान आहे. संगीत संपन्न गाणी सादर करणारे कलाकार स्वतःची आणि



श्रोत्यांची स्वप्रतिमा प्रवाहाच्या अनुभवात रममाण करीत असतात. चित्रपटातील सूरमय गाणी सादर करीत असताना या कलाकारांना अनिल वाळिंबे यांची वाहवा महत्वाची वाटत असते हे मी अनुभवले आहे. गाणे कोणत्या चित्रपटातील, कोण कलाकार गायक कोण यांची इत्यंभूत माहिती अनिल वाळिंबे यांना असल्याने काहीही चूक आढळल्यास ते त्याची जाणीव लगेच




करून देतात. साताऱ्यात आतापर्यंत विविध संगीतमय गाण्यांचे कार्यक्रम त्यांच्या कल्पक गाण्यांच्या निवडीने आणि संयोजनाने झालेले आहेत.

७ जुलै १९४० रोजी स्वातंत्र्यपूर्वकाळात जन्मलेले हे व्यक्तिमत्व इंजिनीअर म्हणून इरिगेशन या डिपार्टमेंटमध्ये नोकरीला होते आणि १९९९ साली सेवानिवृत्त झाले. गेल्या ४० वर्षापासून त्यांचा माझा ऋणानुबंध आहे. साताऱ्याच्या राजघराण्याशी त्याचे असणारे स्नेहसंबंध ते जपत आले आहेत. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे १९७९ साली लंडनला गेले होते. काही महिने त्यांनी त्या ठिकाणी वेगवेगळ्या स्थळांना भेट देऊन महत्वाची माहिती विशेषतः शिवाजी महाराजांच्या बद्दल गोळा केली. या मुक्कामात त्यांनी तेथील बघीतलेल्या घटनांचा पत्ररूपाने अनिल वाळिंबेनी तपशील पाठविला. माझ्या वाचनात त्यातील एक दीर्घ ४ पानी पत्र वाचण्यात आले. श्रीशिवराज्य शके ३०५, श्रावण वद्य ३० शनिवार, नगरी लंडन असा त्या पत्रावर उल्लेख आहे. हे पत्र असे आहे.... चिरंजीव विजयी भव राजश्री अनिलराव, गोड शुभाशीर्वाद ! अनिलराव तुम्ही म्हणत असाल, काय हे! हा गृहस्थ तिकडे गेला तो तिकडचाच झाला. एक पत्र नाही! दीड महिना होऊन गेला तरीही! अनिलराव माझ्या या संपूर्ण पर्यटनाचं मी पुस्तक करणार आहे. हे पुस्तक पत्ररूपानेच असेल. त्यातील प्रत्येक पत्र तुम्हालाच असेल. प्रथम आलो तेव्हां मी असं ठरवल होतं की, मी जसा जसा हिंडेन व जे जे पाहीन ते ते तसंच लगेच पत्रातून लिहायचं अन तुम्हाला पाठवायचं. पण दोन दिवसाच्या अनुभवांनी लक्षात आलं ते, असं लिहिल्याने पत्रें ताजी असतील; पण विषय विस्कळीत राहतील. उदाहरणार्थ, मी ब्रिटीश म्युझियम ग्रंथालयांत जाऊ लागलो. मला नवीन नवीन माहिती व अनुभव मिळत गेले. मी जर एक किंवा दोन पत्रात मिळून या तीन महिन्यातले सर्व अनुभव (लेखनीय अनुभव) जर लिहिले तर त्यात निवडकच गोष्टी येऊ शकतील. पत्रे वाचनीय व सुसूत्र बनतील. विषय शिस्तबद्ध व प्रमाणंबधद स्वरूपांत मांडता येईल. म्हणून रोज पत्रें पाठविण्याचा बेत मी रद्द करून फक्त टिपणें वेळच्यावेळी व जागच्या जागी दैनंदिन ठेवावया सुरुवात केली. आतां नंतर मी सावकाशीने एक एक पत्र, म्हणजे प्रकरण लिहून काढीन.

पत्र मोठे आहे. पहिला पॅरेग्राफवरूनच आपल्याला अनिक वाळिंबे यांचा लोकसंपर्क आणि त्यांनी जोडलेले ऋणानुबंध लक्षात येतात. त्यांचा गाण्यातील आणि संगीतातील वारसा त्यांचे चिरंजीव ॲड. आशुतोष वाळिंबे आणि सून रेश्मा वाळिंबे समर्थपणे पुढे नेत आहेत. दीपलक्ष्मी सांस्कृतिक हॉलमध्ये होणाऱ्या कराओके हिंदी व मराठी गाण्यांच्या कार्यक्रमांसाठी असणारी त्यांची उपस्थिती सर्वांनाच प्रेरणादायी असते. संगीतातील आणि गाण्यातील ताला-सुरांची साथ अनिल वाळिंबे यांना दीर्घायुष मिळवून देईल हे नक्की.

तुका म्हणे जैसे होईजेते संगे ।
वास लागे अंगे चंदनाचा ।।

तुकाराम महाराज म्हणतात, चंदनाच्या वृक्षाच्या सानिध्यात राहून ज्याप्रमाणे इतर झाडांना छानसा सुगंध मिळतो तसाच सदाचार, सद्विचार आणि त्यामुळे वाणीतून प्रकटणारे चांगले उच्चार यांचा सुगंध अनिल वाळिंबे यांच्यासारख्या व्यक्तिमत्वाच्या सहवासाने प्राप्त होतो.

# डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे कार्य इतिहासाला कलाटणी देणारे - डॉ. वि. ल. धारूरकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे जीवनकार्य इतिहासाला कलाटणी देणारे ठरले. त्यांची तेज:पुंज देशभक्ती आणि प्रखर सांस्कृतिक राष्ट्रवादामुळे ते भारतीय इतिहासात अमर झाले आहेत, असे मत ज्येष्ठ विचारवंत व माजी कुलगुरू डॉ. वि. ल. धारूरकर यांनी रविवारी, ६ जुलै रोजी येथे व्यक्त केले.

प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि कलकत्ता विद्यापीठाचे तीनदा कुलगुरूपद भूषवलेले डॉ. मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यांप्रसंगी ‘‘एका महापुरुषाची संघर्ष गाथा‘‘ या अनिल संवत्सर आणि डॉ. धारूरकर यांनी लिहिलेल्या ग्रंथाचे प्रकाशन वॉकर्स क्लबचे कार्याध्यक्ष बाळासाहेब राऊत, उपाध्यक्ष डॉ. शिवाजीराव धनवले, कार्यवाह अनंत पवार आणि अध्यक्ष शिवाजीराव रामरुले यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी वॉकर्स क्लबचे कार्याध्यक्ष डॉ. राऊत होते. प्रारंभी संस्थेचे कार्यवाह अनंत पवार यांनी उपस्थितांचे



स्वागत केले. यावेळी गरवारे उद्योग समूहाचे निवृत्त उपसंचालक अनिल संवत्सर यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. कैलास आतकरे यांनी सूत्रसंचालनासह ग्रंथपरिचय करून दिला.

ग्रंथ प्रकाशनातील अनुभवाची शिदोरी स्पष्ट करताना श्री. संवत्सर म्हणाले की, महापुरुषांचे चरित्रलेखन करणे ही बाब अत्यंत जिकिरीची असते. संदर्भांची जोडणी करणे, घटनांचे विश्लेषण करणे आणि चरित्र नायकाचा जीवनपट समोर ठेवणे याबाबतीत डॉ. धारूरकर यांच्या मार्गदर्शनामुळे हा ग्रंथ लिहिणे सोपे झाले. ग्रंथाची सामुग्री सुमारे ५०० पानांएवढी मोठ्या प्रमाणात तयार झाली होती. परंतु, काळ आणि मर्यादा लक्षात घेऊन हा ग्रंथ १२० पानांत प्रकाशित करण्याचे ठरविले. त्यामुळे ग्रंथाचे अचूक आणि नेमके संपादन करून त्याला बारा प्रकरणांमध्ये बंदिस्त केले. ग्रंथ लेखनातील अनुभव आणि व्यासंग यामुळे पुढील मांडणी करणे आम्हाला शक्य झाले आहे. पुढे ते असे म्हणाले की या पुस्तक प्रकाशना संदर्भात आलेल्या अनेक अडचणींना सामोरे जाताना एमजीएम संस्थेचे कार्यवाह अंकुशराव कदम यांनी प्रकाशनाची सर्व जबाबदारी घेऊन हा ग्रंथ आपल्या हाती सुपूर्द केला. डॉ. धारूरकर म्हणाले की, महापुरुषांचे जीवन म्हणजे अर्धा इतिहास असतो. चरित्र नायकाच्या जीवनातील प्रसंगाशी एकरूप होऊन प्रासादिक भाषेत आणि तेवढेच वस्तुनिष्ठपणे लेखन केले जाते, तेव्हा चरित्रग्रंथ अधिक वाचनीय होतो. यासंदर्भात त्यांनी प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी लिहिलेल्या अरविंद घोष यांच्या जीवनावरील एका महामानवाची मुक्तीगाथा या ग्रंथासंबंधीचा अनुभव सांगितला. याप्रसंगी सिडको वॉकर्स क्लबचे अध्यक्ष शिवाजीराव रामरुले, उपाध्यक्ष डॉ. शिवाजीराव धनवले तसेच विठ्ठल शिरसाठ, दौलतराव मस्के, चौधरी खंडगावकर, खडकीकर, प्रा. मोराळे तसेच डॉ. साळवे, गणेश जाधव, इंगळे आदी उपस्थित होते. शेवटी कार्यवाह अनंत पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# लिनीयर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघाची आषाढी निमित्त दिंडी




**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – पिंपळे सौदागर येथील लिनिअर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने रविवारी आषाढी एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्माई पूजन आणि दिंडीचे आयोजन लिनियर गार्डन मध्ये करण्यात आले होते. राम कृष्ण हरी, ज्ञानोबा माऊली तुकाराम, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठलच्या जयघोषात सर्व सभासद मोठ्या उत्साहाने दिंडीत सहभागी झाले होते. भक्ती गीत, फुगडी या पारंपारिक नृत्य गायन अविष्कारात सर्व आबालारुद्धांनी विठूराया घ्या चरणी आपली सेवा अर्पण केली. संघाचे अध्यक्ष अशोक वारकर यांचे हस्ते श्री विठ्ठल-रुक्माईचे पूजन आणि आरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित सदस्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सर्वस्वी सुरेश बर्डे, दिलीप ताम्हाणे, पांडुरंग कांबळे, दगाजीराव पाटील, हरी मोहन तिवारी, सुरेश वाघाळकर, रमेश काळे, शरद कानेरकर, किशोर देशमुख तसेच अश्विनी शेकटकर, कीर्तीमाला मोरे, छायाताई वायकर, यांनी सहकार्य केले. दिलीप ताम्हाणे यांनी आभार मानले.

# जीवनविषयक दृष्टिकोनाचे सार ‘‘अदम्य जिद्द’’

**ज्योतिर्मय साहित्य**

रामेश्वरच्या सागरतीरापासून ते राष्ट्रपती भवनापर्यंतच्या त्यांच्या विलक्षण जीवन प्रवासाचे लख्ख प्रतिबिंब यात उमटले आहे. हे पुस्तक डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी विविध प्रसंगी विविध ठिकाणी केलेली भाषणे, संवाद, चर्चा यांचे संकलन आहे.

विकसित भारताचे स्वप्न पाहणाऱ्या एका थोर दृष्ट्या नेत्याचे कणखर आदर्श या पुस्तकात पाहायला मिळतो. हा आहे एक मूल्यप्रेमी देशभक्त सच्च्या ज्ञान उपासकाच्या नितळ काळजाचा उत्कट उदगार! अनेक घटना, प्रसंग, कथा, सुविचार यांची ओघवती माला गुंफत डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम आपल्याला एका चिंतनशील, विचारवंत, वैद्यानिक, शिक्षक व राष्ट्रपती अशा विविध भूमिकामध्ये भेटतात. त्यातून त्यांच्या व्यक्तित्वाचे मार्गदर्शक प्रेरणादायी असे विविध पैलू झळाळून उठले आहेत. हे अनमोल विचारधन सर्वांनाच विचारास प्रवृत्त करणारे व आदर्शवत आहेत.


हे पुस्तक हे त्यांच्या आयुष्यातील खऱ्या आलेल्या अनुभवांशी निगडित असल्यामुळे ते अतिशय प्रभावी आणि हृदयस्पर्शी आहे. अनेक अनुभव हे मनाला परिपक्व आणि समृद्ध करणारे आहेत. आयुष्याला योग्य दिशा देणारे आहेत. एका योग्य शिक्षकामुळे आयुष्यात काय काय परिवर्तन होऊ शकते याचे अनेक उदाहरणे जीवनातील अविस्मरणीय ज्वलंत अनुभवावरून मांडलेली आहेत.

आईबद्दलचा अनुभव हृदयद्रावक आहे. स्त्रीत्व ही परमेश्वराची एक सुंदर निर्मिती आहे. मला दोन थोर महिलांच्या आठवणीं न सदैव स्फूर्ती व नवजीवन लाभतं. त्या म्हणजे एक आई आणि भारतरत्न एम.एस. सुब्बालक्ष्मी .

भक्ती म्हणजे जगाची सेवा. श्रोत्यांना मनासह परमेश्वराकडे आणि अस्तित्व प्रकटीकरण असणाऱ्या गोष्टीकडे घेऊन जाणे हा कोणत्याही रागांचा उद्देश आहे. प्रोफेसर विक्रम साराभाई, प्रोफेसर सतीश धवन, प्रोफेसर ब्रह्म प्रकाश, प्रोफेसर एम.जी.के. मेनन., डॉ. राजा रामण्णा यांना अब्दुल कलामांनी त्यांच्या आयुष्यातील महान आत्मे अशी उपमा दिली आहे त्यांच्या अनुभवावरून.

जेव्हा एखादी मोहीम प्रगतीपथावर असते तेव्हा त्यामध्ये काहीतरी अडचणी किंवा अपयश या गोष्टी कायम उद्भवतात. पण या मोहिमेची सूत्र त्या अपयश च्या हाती जाऊ नयेत. परिवर्तन ही दूरदर्शी दृष्टिकोन नवोपक्रमशील कल्पक मन आणि मार्गदर्शक नेतृत्व यांची फल निष्पत्ती असते. एखादी गोष्ट करण्यासाठी सर्व शक्तिनिशी झपाटून काम करणारा माणूस पहिला की कल्पना चावला यांना स्फ ूर्ती व प्रेरणा लाभत असे.

कल्पना चावला म्हणायच्या की मी आकाशगंगेची कन्या आहे. माझे




शिक्षक या भागात तर अब्दुल कलाम यांचे विचारधन मनाला फार भावले. उमलती मन प्रज्वलित करण हे शिक्षकांसमोर महान जीवित ध्येय असतं. आपल्या समाजात व लहान मुलांच्या जीवनामध्ये शिक्षका च स्थान माता पित्यानंतरच पण परमेश्वराच्या आधीच आहे. शिक्षकी पेशा हा जगातील वंदनीय पेशा आहे. बालपण हा पायाचा दगड असतो. याच पायावर अवघ्या जीवनाचा डोलारा उभा राहतो. शिक्षकांनी अभ्यासात कमजोर असलेल्या विद्यार्थ्यांना अधिक जास्त समजावून देण्याची त्यांना शिकवण्यात साहाय्य करण्याची असा शिक्षक हा खरा गुरू असतो. डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण न शिक्षकांना सल्ला देतात आपण सदैव बौद्धिक एकात्मता व सार्वत्रिक अनुकंपा यांचा पाठपुरावा केला पाहिजे. खऱ्या गुरूमध्ये ही दोन गुणवैशिष्ट्ये असतात.

उत्तम शिक्षक अत्यंत बारकाईने योजना आखून स्वतःला अध्यापनासाठी आणि विद्यार्थ्याला ज्ञान संपादनासाठी सज्ज करतो. श्री शिव सुब्रमणीय अय्यर हे सर्वोत्तम शिक्षक होते. शास्त्रीय मिमांसेसोबत निसर्गाची उपलब्ध असणारी प्रत्यक्ष व्यवहारातील उदाहरणही समजावून देत होते. ही खरोखर शिकवण !

डॉ. सतीश धवन हे अब्दुल कलाम यांचे दुसरे प्रेरणा स्थान. या दोन्ही शिक्षक यांनी महत्वाच्या गोष्टी शिकवल्या. गुरू शिष्याला ज्ञान देतो आणि भव्यदिव्य स्वप्ने व ध्येय रुजवून शिष्याच्या जीवनाला आकार देतो. गुरू शिष्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करतो आणि मी एखादी गोष्ट करू शकतो ही जिद्द शिक्षण व शिकत राहणे या प्रक्रियांद्वारे त्यांच्या मनावर बिंबवण्यास मदत करतो.गुरूचे जीवन अनेक दीप उजळवते. शिक्षक अनेकाना काही दशक पुढे नेतात. तुम्ही सचोटीने वागणारे असाल तर इतर कोणत्याही गोष्टीला काही महत्व नसतं, आणि काही अर्थ नसतो. शिक्षकांनी आयुष्यभर शिकणारा ज्ञान उपासक घडवायचा आहे. मुलांच्या चेहऱ्यावरील गुलाब जपू या.बेस्टोलॉजी या शिक्षकाचे मत वचन एखा द मूल सात वर्ष माझ्याकडे सोपवा. त्यानंतर ते मूल परमेश्वर किंवा सैतान कुणीही न्याव ते त्या मुलाला बदलू शकत नाहीत. शिक्षकच सामर्थ्य अस असतं. स्वतंत्र्य ग्यानोपासक घडवा. बुद्धिमत्ता ओळखा व तिची जोपासना करा. आपल्याला ज्या प्रकारचे समाज घडवायचे आहे त्या प्रकारचे शिक्षण आपण दिले पाहिजे. शाळांनी फक्त शैक्षणिक केंद्रे असून चालणार नाही तर त्यांनी ज्ञान व कौशल्य केंद्रे बनले पाहिजे.

**(क्रमशः)**




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559